# वसई-विरार शहर महानगरपालिका
## क्रीडा विभाग

दि.२५/०७/२०२२

## प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिका, क्रीडा व युवक संचलनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा परिषद कार्यालय पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरशालेय जिल्हास्तरीय **'सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा २०२२'** या स्पर्धेचा शुभारंभ माजी प्रथम महापौर मा.श्री.राजीव पाटील यांचे शुभहस्ते सोमवार दिनांक २५/०७/२०२२ रोजी जुने विवा महाविद्यालय शेजारील मैदान, विरार (प.) या ठिकाणी करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अतिथी मा.श्री.अनिलकुमार पवार, वसई विरार शहर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक, माजी महापौर मा.श्री.नारायण मानकर, मा.श्री.प्रवीण शेट्टी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त मा.श्री.आशिष पाटील, माजी सभापती मा.श्री.यज्ञेश्वर पाटील, माजी महिला व बालकल्याण सभापती मा.श्रीमती माया चौधरी, तसेच अन्य सन्माननीय माजी नगरसेवक व नगरसेविका, कर्मचारी इ.उपस्थित होते.

सदर फुटबॉल स्पर्धा ही दि.२५/०७/२०२२ ते ०१/०८/२०२२ या कालावधीत खेळवली जाणार असून या स्पर्धेमध्ये जवळपास ८५ शाळांतील संघांनी सहभाग घेतला आहे. ही स्पर्धा दोन वयोगटात असून १४ वर्षाखालील मुले तसेच १७ वर्षाखालील मुले व मुली अशी असणार आहे.

**क्रीडा विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**